(12-02-2011 Saturday)

जावक क्रमांक ९६७/२०११.
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई.
दिनांक– १२/०२/२०११.

प्रति,

अमीरअली इब्राहिम श्रॉफ,
श्रीमती. रजिया अमीरअली श्रॉफ
रा.ठी. फ्लॅट क्र. ७०१/७०२,
'इ' विंग मधुबन कॉ.हौ.सो.,
यारी रोड, वर्सोवा, मुंबई–६१.

विषय :– तपासकामी कागदपत्रासह हजर रहाणेबाबत...
संदर्भ :– गु.र.क्र.२४२/१०,कलम ४२०,४६५,४६७,४६८,४६९,४७१,४७४,
१२०(ब),५०६,३४ भा.दं.वि.संहिता.

उपरोक्त विषय व संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, आझाद मैदान पोलीस ठाणे येथे आपण व इतरांविरूध्द वरील संदर्भान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्याच्या संदर्भातील खालील नमुद तपशिलाची मुळ कागदपत्रे घेवुन या पोलीस ठाण्यास न चुकता वेळेवर हजर रहाणे.

१) श्रीमती रजिया अमीरअली श्रॉफ यांनी मुलगा नामे आसिफ व फैय्याज यांना दिलेल्या दि. १२/०४/१९९९ रोजीच्या अधिकार पत्रांच्या मुळ प्रती.

२) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेली याचिका क्र.२६७७/०७ सोबत जोडलेल्या अधिकार पत्राच्या मुळ प्रती.

३) श्रीमती रजिया अमीरअली श्रॉफ, श्रीमती मुमताज सांगाणी व सिराज प्रधान यांनी वांद्रा येथील सिटी सर्व्हे क्र.एन/३४६, एन/३४७, एन/३४८, एन/३४९ येथील जागा फैय्याज व आसिफ यांच्या नावे करण्याबाबत दिलेले अधिकार पत्राच्या मुळ प्रती.

४) सिटी सर्व्हे क्र.१२१ महालक्ष्मी ईस्टर्न साईड ऑफ वरळी, लोअर परेल डिव्हीजन १/४७, २/४७, ११७, ११८, ११९, १२०, १२१ यांचे मुळ मालमत्ता पत्रक.

आपण मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे अटकपुर्व जामीन मिळणेबाबत केलेला अर्ज क्र. २८९/११ बाबत दि. ०८/०२/११ रोजी सुनावणी होऊन पुढील सुनावणी दि. १५/०२/११ रोजी ठेवण्यात आली आहे. तरी वर नमुद कागदपत्राबाबत तपास करणेकामी आपण दि. १४/०२/११ रोजी १४:३० वा. न चुकता कागदपत्रासह समक्ष हजर रहावे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक,
आझाद मैदान पोलीस ठाणे,मुंबई.